**नियमित फौजदारी खटला क्र. २१२/२०१९**
**निशाणी क्र. ५०/क**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक ५ ची जबानी</u>**

| | |
|---|---|
| माझे नांव | - बजरंग दत्तात्रय पोवार |
| वय वर्षे | - ६५ |
| नोकरी | - सेवानिवृत्त |
| राहणार | - पु।। शिरोली, ता.हातकणंगले जि.कोल्हापूर |

<u>सरतपास सरकारी वकील श्री.व्ही.पी.कुसुरकर यांच्यातर्फे -</u>

सन २०१५/१६ रोजी मी वडगांव पोलीस स्टेशन येथे ASI म्हणून कार्यरत होतो. त्यावेळसे गुन्हा रजि.नं. ९७/२०१६ भादविस ४०६ चा तपास माझ्याकडे वर्ग करण्यात आला होता. ठाणे अंमलदारनी तक्रार नोदविल्यानंतर व नंदा फुड्स ने दिलेल्या कागदपत्रानुसार पुढील तपास मी केलेला होता. मी विशाल कुलकर्णी, मानसिंग खोत, अरुण साळोखे, राजाभाऊ क्षिरसागर, फिर्यादी सावंता विठ्ठल माळी यांची तपास टिपण नोंदविली. आरोपी हर्षवर्धन वसंतराव चव्हाण यांनी नंदा फुड्स् कडून पक्षी संगोपणासाठी दि.०३/०८/२०१५ पासून दि.१३/०४/२०१६ पर्यंत घेतले होते. तपास दरम्यान असे आढळून आले की, संगोपणासाठी घेतले असता ५० किलोचे ६८ खाद्य पदार्थाचे पोती अंदाजे ३४०० किलो १ लाख २००० रुपये किंमतीचे व कंपनीने दिलेल्या पक्षामधून ७५ पक्षी कमी दाखविले. त्याची र रुपये ९५११/- असे एकूण १,११,५०० रुपयेचा अपहार करुन व कंपनीच्या अटी व शर्तीचा भंग करुन रेकॉर्ड नाहीसे केले. तसेच तपास दरम्यान असे आढळून आले की, आरोपीने रेकॉर्ड नाहीसे केल्यामुळे कंपनीचा विश्वासाघात केल्यामुळे त्याच्यावर भादविस कलम ४०६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. मी आरोपीला पाहील्यास ओळखू शकतो. आज रोजी आरोपी कोर्टात हजर आहे.

**सरतपास संपला.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री.आर.आर.पाटील यांच्यातर्फे -</u>**

नंदा फुड्स् हे सांगली येथे स्थायीक कंपनी आहे. फिर्यादीचा जबाब एकदा घेतल्यानंतर तो मी परत घेतलेला नाही. ठाणे अंमलदारनी मला फिर्याद दिल्यानंतर ते मी वाचून पाहीलेले आहे. मी घटना घडलेल्या ठिकाणी गेलेलो नाही. मी कंपनीकडून तपास कामी रजिस्टर घेतलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, साक्षीदारांचे साक्ष त्याच्या अपरोक्ष तपास केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने कोणताही गुन्हा न केल्यामुळे त्याच्या विरुध्द

खोटी दोषारोपत्र दाखल केलेले आहे.  हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

श्रवणोत्तर स्वीकृती,

Sd/-

(आर.एस.मोरे)

दि. २०/०२/२०२६

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पेठ वडगाव